दि. १८ फेब्रुवारी, २०१५

ठाणे महानगरपालिका आयुक्त म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ९५ अन्वये सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे सुधारित व सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता ठाणे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पासाठीचे उत्पन्न व खर्चाचे मूळ अंदाज सादर करीत आहे.

ठाणे महानगरपालिका आयुक्त म्हणून मी, दि.१२ जानेवारी २०१५ रोजी पदभार स्वीकारला. ठाणे शहराची भौगोलिक पहाणी करुन, येथील नागरिकांच्या समस्या, त्यांना देण्यात येणा-या सुविधा आणि नागरिकांच्या महापालिकेकडून असलेल्या अपेक्षा यांचा विचार करुन जमा खर्चाचा ताळमेळ घालण्याचा प्रयत्न केला आहे. ठाणे महानगरपालिकेची कमकुवत आर्थिक घडी सुधारण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आर्थिक शिस्त ही कडू औषधासारखी असते, सुरुवातीला ती कडू असली तरी, त्याचे दूरगामी चांगले परिणाम दिसून येतात.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार सन २०१४-१५ च्या उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ घेऊन तत्कालीन आयुक्तांनी **रु.२१६६ कोटीचा** अर्थसंकल्प तयार केलेला होता. मा. स्थायी समितीने त्यामध्ये **रु.१८९ कोटीची** वाढ प्रस्तावित करुन **रु.२३५५** कोटीचा अर्थसंकल्प मा. महासभेपुढे सादर केला. त्यानंतर लोकसभा सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्याने मार्च २०१४ पूर्वी अर्थसंकल्पास मा. महासभेची अंतिम मान्यता मिळाली नाही. आर्थिक वर्ष पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष जमा व प्रत्यक्ष खर्चाचा ताळमेळ घेऊन मा. महासभेने सन २०१४-१५ मध्ये आवश्यक दायित्वाच्या प्रदानासाठी लागणारी तरतूद व काही प्रमाणात नवीन कामासाठी वाढीव तरतूद प्रस्तावित करुन **रु.२७९६** कोटीचा अर्थसंकल्प मंजूर केला. सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आलेली असून महापालिकेचे उत्पन्न विचारात घेऊन त्यानुसार अर्थसंकल्पातून खर्च करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रत्यक्ष प्राप्त होणा-या उत्पन्नानुसार मा. महासभेने मान्य केलेल्या तरतुदी विचारात घेऊन त्या तरतुदींच्या मर्यादेपर्यंत व चालू असलेल्या कामाचे दायित्व विचारात घेऊन नवीन कामे निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्यात येतील. जानेवारी २०१५ पर्यंत प्रत्यक्ष प्राप्त महसुली उत्पन्न, प्राप्त

अनुदाने व प्राप्त कर्जे यांचा विचार करुन सन २०१४-१५ चा अर्थसंकल्प **रु.१६४९ कोटी ७५ लक्ष** इतका सुधारित करण्यात आलेला आहे.

ठाणे महानगरपालिकेचे सध्याचे महसुली उत्पन्न व यापूर्वी निर्माण झालेले दायित्व पहाता अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना ठाणेकर नागरिकांसाठी किमान नागरी सुविधा उपलब्ध करुन देणे हे माझ्यासमोर आव्हान असून महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नाच्या वसुलीवर भर देऊन ते पूर्ण करावे लागणार आहे याशिवाय दुसरा पर्यायही समोर दिसत नाही. सन २०१४-१५ मध्ये कठोर निर्णय घेऊन व महसुलाच्या वसुलीत वाढ करुन कमीत कमी दायित्व पुढील वर्षी हस्तांतरीत करण्याचा माझा प्रयत्न असून पुढील वर्षी ठाणेकरांसाठी नवीन नागरी सुविधांच्या कामासाठी तरतूद करता येईल. यावर्षी स्थानिक संस्था कराबाबतची संभ्रमता, अंदाजित केलेली अनुदाने व कर्जे प्राप्त न झाल्याने उत्पन्नात तूट येण्याची शक्यता आहे. परंतु सन २०१५-१६ चा अर्थसंकल्प तयार करताना संपूर्ण विभागांचा कामनिहाय आढावा, प्रलंबित दायित्व यांचा सविस्तर विचार करण्यात आलेला असून त्यानुसार पुढील वर्षी नवीन कामांसाठी तरतुदी प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. ठाणेकर नागरिकांच्या मुलभूत गरजा लक्षात घेऊन त्याच बाबींवर लक्ष केंद्रीत करुन नागरिकांच्या मनात महानगरपालिकेविषयी चांगली भावना निर्माण करण्याचा माझा प्रयत्न असणार आहे. त्याशिवाय प्रशासनामध्ये ऑन लाईन सुविधा द्वारे नागरी सेवा देऊन नागरिकांची कामे तात्काळ पूर्ण करण्यासाठी संगणकीकरणावर भर देण्यात आलेला आहे. ठाणे शहराच्या सुनियोजित विकासाबाबत मी कटिबध्द आहे. याबाबत मी माझ्या भावना एका शेर द्वारे व्यक्त करतो.

" मंजीलोकी असली उडान अभी बाकी है !
इरादों के इम्तीहान अभी बाकी है
अभी तो नापी है मुठ्ठीभर जमीन
आगे सारा आसमान बाकी है ! "

# सन २०१४-१५ चे सुधारित अंदाज

( रकमा कोटी रुपयात)

| अ.क्र. | तपशील | सन २०१४-१५ चे मूळ अंदाज | सन २०१४-१५ चे सुधारित अंदाज |
|---|---|---|---|
| १ | महापालिका उत्पन्न | १८१४.०० | १४३७.०० |
| २ | अनुदाने | ३५२.६९ | १२६.७७ |
| ३ | कर्ज | ५८४.१९ | ४०.८६ |
| ४ | आरंभीची शिल्लक | ४५.१२ | ४५.१२ |
| | एकूण जमा | २७९६.०० | १६४९.७५ |
| | | | |
| १ | महसुली खर्च | १२०५.७३ | ९३५.६० |
| २ | भांडवली खर्च (अ व क अंदाज) | ११६२.१५ | ५६२.५५ |
| ३ | भांडवली खर्च (जेएनएनयुआरएम) | ४२७.८८ | १५१.३६ |
| ४ | अखेरची शिल्लक | ०.२४ | ०.२४ |
| | एकूण खर्च | २७९६.०० | १६४९.७५ |

# सन २०१५-१६ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज

( रकमा कोटी रुपयात)

| अ.क्र. | तपशील | सन २०१५-१६ चे मुळ अंदाज |
|---|---|---|
| १ | महापालिका उत्पन्न | १७०६.०० |
| २ | अनुदाने | २०२.९९ |
| ३ | कर्ज | ८८.७७ |
| ४ | आरंभीची शिल्लक | ०.२४ |
| | एकूण जमा | १९९८.०० |
| | | |
| १ | महसुली खर्च | ११२८.२९ |
| २ | भांडवली खर्च (अ व क अंदाज) | ६४४.६६ |
| ३ | भांडवली खर्च (जेएनएनयुआरएम) | २२४.८५ |
| ४ | अखेरची शिल्लक | ०.२० |
| | एकूण खर्च | १९९८.०० |

# सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्टये

## जमा बाजू :

- स्थानिक संस्था कराच्या दरात वाढ
- मालमत्ता करातील जललाभ कर व मलनिःसारण लाभ करात वाढ
- विकास शुल्कामध्ये वाढ
- मालमत्तेच्या क्षेत्रफळानुसार  निवासी पाणी पुरवठा दराची आकारणी
- मुंबई महापालिकेचे दर विचारात घेऊन जाहिरात फी मध्ये वाढ
- निवासी व अनिवासी मालमत्तांवर घनकचरा सेवा शुल्काची आकारणी
- अनधिकृत बांधकामे व अतिक्रमण प्रतिबंधासाठी शास्ती व दरवाढ.
- परवाना शुल्काच्या दरात वाढ

## खर्च बाजू :

- वाहतूक सिग्नल यंत्रणेत सुधारणा
- पार्कींग सुविधा धोरण व ऑफ स्ट्रीट पार्कींग व्यवस्था
- मिसिंग लिंक पूर्ण करुन रस्ते जोडण्यावर भर
- शहरातील सांडपाण्याचा विनियोग करण्यासाठी लहान एसटीपीसाठी तरतूद
- स्मार्ट सिटी सर्व्हीलन्स प्रकल्पाअंतर्गत सीसीटीव्ही बसविणे
- एकात्मिक नागरी वाहतूक सुविधा सर्वेक्षण व सुविधा
- पादचारी पुलांचे काम पूर्ण करण्यावर भर
- अस्तित्वातील जकात नाक्यांचा बस, ट्रक व कार टर्मिनस म्हणून विकास.
- विकास आराखडयातील रस्ते विकसित करणे
- कळवा खाडीवर पूल
- विकास हक्क हस्तांतरणांच्या (कंन्स्ट्रक्शन टीडीआर) माध्यमातून विकास कामे
- स्वच्छ ठाणे कार्यक्रम
- तलावांचे संवर्धन व पुनरुज्जीवन
- घनकचरा हस्तांतरण स्थानक विकास
- सफाई मार्शलची नेमणूक
- यांत्रिकी पध्दतीने रस्ते साफसफाई

- **परिवहन उपक्रमासाठी ओवळा बस डेपोचे कार्यान्वयन**
- **माफक दरात अत्याधुनिक डायलेसिस सुविधा**
- **दवाखान्यांचे आधुनिकीकरण**
- **सोडीयम व्हेपर दिव्यांच्या वीज बिल बचती मधून (Cost Saving) एलईडीचा वापर**
- **दोन वर्षात ५ लक्ष वृक्ष लागवड**
- **थीमपार्कचा पीपीपी माध्यमातून विकास**
- **सायन्स पार्क**
- **दोन अग्निशमन केंद्राची पुनर्बांधणी**
- **कौसा क्रीडा संकुल पूर्णत्वास नेणे**
- **पीपीपी मॉडेलवर कृत्रिम प्रस्त्रारोहण (Artificial Climbing Wall)**
- **तरण तलावांचा बीओटी तत्वावर विकास**
- **मलनिःसारणासाठी नवीन जेटींग वाहन**
- **प्राथमिक शिक्षणामध्ये ई- लर्निंगचा वापर**
- **शहर फेरीवाला धोरण**
- **मीटरद्वारे पाणी पुरवठा**
- **प्रशासकीय कामकाजात सुधारणा**
- **संगणकीकरण**

## महानगरपालिका महसुली उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत

१. **स्थानिक संस्था कर :** महाराष्ट्र शासनाने दिनांक १ एप्रिल २०१३ पासून ठाणे महानगरपालिकेमध्ये जकात कराऐवजी स्थानिक संस्था कर लागू केलेला आहे. सन २०१४-१५ च्या मूळ अंदाजपत्रकात स्थानिक संस्था करापोटी रु.७२५ कोटी उद्दिष्ट अपेक्षित करण्यांत आले होते. परंतु जानेवारी २०१५ पर्यंतचे उत्पन्न पहाता सन २०१४-१५ मध्ये **रु.५८५.११ कोटी** इतकी सुधारित जमा अपेक्षित करण्यात आली आहे.

स्थानिक संस्था कराचे दर निश्चित करताना पूर्वीच्या

जकात कराचे दर विचारात घेतले नव्हते म्हणून स्थानिक संस्था कराच्या काही बाबींमध्ये पूर्वीच्या जकातीचे दर विचारात घेऊन प्रचलित दरामध्ये वाढ करणे आवश्यक आहे. त्यामुळे स्थानिक संस्था कराच्या काही बाबींच्या दरात वाढ करण्यात येणार असून या दरवाढीस शासनाची मान्यता प्राप्त झाल्यावर वाढीव उत्पन्न गृहीत धरुन सन २०१५-१६ मध्ये मुद्रांक शुल्क अधिभारासहीत स्थानिक संस्था करापासून **रु.६५० कोटी** उत्पन्न अपेक्षित आहे.

२. **मालमत्ता कर** : मालमत्ता कर व फी पासून सन २०१४-१५ मध्ये **रु.३०२.९१ कोटी** इतके उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले होते. परंतु जानेवारी २०१५ पर्यंतचे प्रत्यक्ष उत्पन्न पहाता मालमत्ता करापासूनचे उत्पन्न **रु.२८२.२८ कोटी** सुधारित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० दिनांक १ जून २०१० या अधिसूचनेद्वारे मालमत्ता करात सुसूत्रता आणण्यासाठी भांडवली मूल्यावर आधारित कर प्रणालीचा पर्याय उपलब्ध असून ही करप्रणाली महापालिकेत सुरु करण्याचा मानस आहे. त्याच्या अंमलबजावणीस आपणा सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा आहे.

महानगरपालिकेने पाणी पुरवठा जललाभ करामध्ये बऱ्याच वर्षापासून वाढ केली नव्हती. सध्या पाणी पुरवठा विभागावर होणारा खर्च व पाणी पुरवठा आकारापोटी वसूल होणारी रक्कम यामधील तफावत लक्षात घेता ही तूट काही अंशी कमी करण्यासाठी जललाभ करात निवासी वापरासाठी ७

टक्क्यावरुन १२ टक्के व बिगर निवासी वापरासाठी १२ टक्क्यावरुन १७ टक्के वाढ प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच मलनिःसारण लाभकरामध्ये निवासी वापरासाठी करयोग्य मूल्याच्या ४ टक्क्यावरुन ९ टक्के आणि बिगर निवासी वापरासाठी करयोग्य मूल्याच्या ७.५० टक्क्यावरुन १२.५० टक्के वाढ प्रस्तावित आहे.

मिळकतीचे करयोग्य मूल्य निश्चित करतांना निर्धारित केलेल्या वाजवी भाडयामध्ये मागील ९ ते १० वर्षात वाढ न केल्याने यात वाढ करणे आवश्यक आहे. यामुळे नवीन विकसित होणा-या मिळकतींच्या कर आकारणीत वाढ होईल.

या दरवाढीमुळे होणारे वाढीव उत्पन्न विचारात घेऊन सन २०१५-१६ मध्ये मालमत्ता कर, फी, प्रशासकीय आकार, शास्तीसह अंदाजे **रु.३४८.६२ कोटी** इतके उत्पन्न अपेक्षित केले आहे.

**३. विकास व तत्सम शुल्क :** सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात शहर विकास विभागाकडून विकास व तत्सम शुल्कापोटी **रु.४९० कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यांत आले होते. त्यामध्ये प्रामुख्याने शैक्षणिक भूखंड भाडे करारापासून **रु.८१ कोटी** अपेक्षित होते परंतु याबाबतची कार्यवाही मार्च अखेर पूर्ण न झाल्यास उत्पन्न मिळणार नसल्यामुळे व जानेवारी २०१५ पर्यंतच्या प्रत्यक्ष जमा रकमा विचारात घेता शहर विकास विभागाकडून **रु.२८० कोटी** सुधारित उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात विकास शुल्क आकारणीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना

अधिनियमातील तरतुदी नुसार दिलेल्या कमीत कमी दरामध्ये ०.५ टक्क्यावरुन १ टक्का व २ टक्क्यावरुन ३ टक्के इतकी वाढ प्रस्तावित करण्यात आली आहे.

शहरातील वाणिज्य वापराकरिता जिना अधिमूल्य रेडी रेकनरमधील दराच्या ५० टक्के प्रमाणे प्रति चौ. मी. प्रमाणे आकारण्याचे प्रस्तावित आहे. तसेच डिआरसी प्रमाणपत्र अदा केल्याचे दिनांकापासून दोन वर्षानंतर युटीलायझेशन प्रस्ताव दाखल झाल्यास युटीलायझेशन छाननी शुल्काचे दर पुर्वीच्या दरापेक्षा दुप्पट करण्याचे प्रस्तावित आहे. या सर्व वाढी विचारात घेऊन सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात **रु३५० कोटी** उत्पन्न अपेक्षित केले आहे.

४. **शैक्षणिक भूखंडांबाबत** : ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मंजूर विकास आराखडयातील शैक्षणिक प्रयोजनार्थ आरक्षित असलेले भूखंड खाजगी शैक्षणिक संस्थांना वितरित करण्यासाठी महापालिकेच्या धोरणानुसार प्रशासनामार्फत स्थानिक संस्थांकरिता असलेले ७ भूखंड व अस्थानिक संस्थांसाठी असलेले ९ भूखंड अशा एकूण १६ भूखंडाकरिता प्रस्ताव विनंती अर्ज (RFP) मागविण्यात आले होते. सदर प्रस्ताव विनंती अर्जानुसार स्थानिक संस्थांसाठी असलेल्या ७ भूखंडासाठी रु. २३.४५ कोटी व अस्थानिक संस्थांसाठी असलेल्या ९ भूखंडासाठी रु.४९.८३ कोटी इतके अधिमूल्य निश्चित केले होते.

अंतिम करण्यात आलेल्या ७ स्थानिक व ४ अस्थानिक संस्थांकडून भूखंडाच्या भाडेपट्टी कराराद्वारे एकूण

रु.१०१ कोटी प्राप्त होणार आहेत. अस्थानिक संस्थांसाठीच्या उर्वरीत पाच भूखंडाच्या रु.३२.३८ कोटी मूळ अधिमूल्याचे फेर प्रस्ताव विनंती अर्ज मागविण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे. त्यानुसार स्थानिक संस्थांकडून रु.१० कोटी व अस्थानिक संस्थांकडून रु.३० कोटी असे मिळून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता **रु.४० कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले आहे.

**५. पाणी पुरवठा आकार :** पाणी पुरवठा विभागासाठी सन २०१४-१५ मध्ये अपेक्षित केलेल्या **रु.११० कोटीच्या** अंदाजाप्रमाणे पूर्ण वसुली करण्यासाठी प्रयत्नशील आहोत.

पाणी पुरवठा विभागातील जमा व खर्चाचे व्यस्त प्रमाण व सध्या अस्तित्वातील ठोक दर पहाता त्या दरामध्ये क्षेत्रफळाच्या प्रमाणात दर आकारणी करणे आवश्यक आहे. त्यानुसार बैठया चाळी, झोपडपट्टी यांना दरमहा रु.१०० प्रति कुटुंब याऐवजी दरमहा रु.१३० प्रतिकुटुंब व इमारतीमधील सदनिकाधारकांना क्षेत्रफळाच्या प्रमाणात खालील प्रमाणे दर आकारणी करण्याचे प्रस्तावित आहे.

| अ.क्र | सदनिकांचे क्षेत्रफळ (चौ. फूटात) | दरमहा पाणी पुरवठा आकार (रुपयात) |
|---|---|---|
| १ | ० ते २५० | २०० |
| २ | २५० ते ५०० | २२० |
| ३ | ५०० ते ७५० | २५० |
| ४ | ७५० ते १००० | २८० |
| ५ | १००० ते १२५० | ३१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | १२५० ते १५०० | ३५० |
| ७ | १५०० ते २००० | ३९० |
| ८ | २००० ते २५०० | ४३० |
| ९ | २५०० चौ. फूटावरील | ४७० |

या प्रस्तावित दरवाढीमुळे वार्षिक **रु.२५ ते ३० कोटी** वाढीव उत्पन्न मिळेल असे गृहीत धरुन सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी **रु.१४५ कोटी** उत्पन्न अपेक्षित केले आहे.

व्यावसायिक संयोजनाच्या दरामध्ये २०१२ साली दरवाढ केलेली असल्याने यामध्ये नव्याने दरवाढ प्रस्तावित नाही.

**६. अग्निशमन विभागाकडील फी** : सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात **रु.७१.१३ कोटी** उत्पन्न अपेक्षित केले होते परंतु जानेवारी २०१५ च्या प्रत्यक्ष प्राप्त रकमा पहाता ते सुधारित करुन **रु.४९.६२ कोटी** करण्यात येत आहे.

महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार इमारतीना फायर प्रिमियम चार्जेस व फायर इन्फ्रास्ट्रक्चर चार्जेस आकारण्यात येतात. यापासून रु.५३.१४ कोटी अपेक्षित केलेले आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाय योजना अधिनियम, २००६ चे कलम ११ अन्वये तरतूद करण्यात आलेली अग्निशमन सेवा फी आकारण्याचे प्रस्तावित करण्यात येत असून, सदर फी पोटी अंदाजे **रु.५० लक्ष** उत्पन्न अपेक्षित आहे.

सन २०१५-१६ साठी अग्निशमन विभागाकडून **रु.५५.१४ कोटी** उत्पन्न अपेक्षित केलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| ७. | **रस्ता खोदाई फी** : | सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रस्ता खोदाई फी पासून **रु.६० कोटी** उत्पन्न अपेक्षित केलेल्या उत्पन्नापेक्षा जास्त प्राप्त होणार असल्याने ते सुधारित करुन **रु.६७ कोटी** अपेक्षित धरण्यात आले आहे.<br>रस्ता खोदाई फी मध्ये दरवाढ प्रस्तावित असल्याने दरवाढीचा प्रस्ताव स्वंतत्रपणे मा. महासभेकडे सादर करण्यात येईल. सदर दरवाढ विचारात घेऊन सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात रस्ता खोदाई फी पासून **रु. ५५ कोटी** उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले आहे. |
| ८. | **जाहिरात कर** : | सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात जाहिरात करापोटी अंदाजित केलेले रु.८.८९ कोटी वरुन **रु.८.०६ कोटी** सुधारित उत्पन्न प्रस्तावित आहे.<br>जाहिरात विभागाच्या महसूल वाढीच्या दृष्टीने ठोस उपाययोजना करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आकारण्यात येणा-या जाहिरात फीच्या प्रचलित दरापेक्षा १०टक्के कमी दर ठाणे महानगरपालिकेच्या जाहिरात फी साठी प्रस्तावित करण्यात येत असून ही दरवाढ गृहीत धरुन सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात **रु.१६ कोटी** इतके उत्पन्न अपेक्षित केले आहे. |
| ९. | **घनकचरा सेवा शुल्क** : | केंद्र शासनाने जेएनएनयुआरएम अंतर्गत विविध प्रकल्पांना मान्यता देताना सुधारणा (Reforms) कार्यक्रम राबविण्याची अट घालण्यात आली होती. त्यानुसार घनकचरा सेवाशुल्क आकारणे क्रमप्राप्त झाले आहे. सदर सेवाशुल्क आकारणी केल्यामुळे सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात होणारी |

वाढ गृहीत धरुन घनकचरा विभागाकडून **रु.१९.७२ कोटी** उत्पन्न अपेक्षित केले आहे.

१०. **स्थावर मालमत्ता** : महानगरपालिकेच्या स्थावर मालमत्तांपासून अपेक्षित केलेले उत्पन्न प्राप्त करण्यात येणार आहे. सद्यस्थितीतील स्थावर मालमत्तांची रेडी रेकनरप्रमाणे आकारणी करुन व जप्त मिळकतींची पुनर्बांधणी करुन उत्पन्नात वाढ करता येईल. त्यानुसार सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी **रु.१०.९५ कोटी** उत्पन्न अपेक्षित केले आहे.

११. **परवाना विभाग** : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार महापालिका क्षेत्रातील उद्योगधंदा व व्यवसाय करणा-या आस्थापनाधारकांना परवाने देताना महानगरपालिकेस मिळणा-या परवाना शुल्क, नुतनीकरण शुल्क, विलंब शुल्क यामध्ये वाढ करण्याचे प्रस्तावित असून त्यापासून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात **रु.१.३० कोटी** इतके उत्पन्न अपेक्षित केले आहे.

१२. **अतिक्रमण नियंत्रण विभाग** : अतिक्रमणे नियंत्रण व निष्कासन करण्यासाठी येणारा खर्च हा संबंधितांकडून वसूल करणे तसेच अनधिकृत बांधकामे व अतिक्रमण होण्यास प्रतिबंध व्हावा म्हणून त्यास शास्ती लावणे करिता सन २००७ साली दर निश्चित करण्यात आले होते. त्यामध्ये वाढ प्रस्तावित करण्यांत येत आहे. फेरीवाला नोंदणी व फेरीवाला आकार मिळून **रु. ५ कोटी** अपेक्षित करुन या सर्व बाबींपासून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात **रु.६.९० कोटी** उत्पन्न अपेक्षित केले आहे.

**१३. अनुदाने** : सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी **रु.३५२.६९ कोटी** अनुदान अपेक्षित होते. परंतु आतापर्यंत प्रत्यक्षात प्राप्त झालेले **रु.७१.३८ कोटी** अनुदान व जेएनएनयुआरएम अंतर्गत कामांची प्रगती पहाता सुधारित अंदाजपत्रकात एकूण **रु.१२५.५१ कोटी** सुधारित अनुदान अपेक्षित धरण्यात आले आहे.

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात अ आणि क अंदाजपत्रकामध्ये **रु.६९.३९ कोटी**, जेएनएनयुआरएम अंतर्गत प्रकल्पांसाठी **रु.१३३.६१ कोटी** असे एकूण **रु. २०२.९९ कोटी** केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान अपेक्षित धरण्यात आले आहे.

**१४. कर्जे** : सन २०१४-१५ मध्ये कर्ज घेण्याची शक्यता कमी असल्यामुळे मूळ अंदाजपत्रकात असलेली **रु.५८४.१९ कोटी** तरतूद कमी करुन आतापर्यंत प्रत्यक्षात प्राप्त झालेले **रु.४०.८६ कोटी** इतकी सुधारित तरतूद करण्यांत आली आहे.

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात फक्त जेएनएनयुआरएम अंतर्गत प्रकल्पांसाठी **रु.८८.७७ कोटी** कर्ज घेण्याचे प्रस्तावित आहे. परंतु कामाची प्रगती व निधीच्या आवश्यकतेनुसार कर्ज घेण्यात येईल. बी.एस.यु.पी. साठी हुडको कडून व परिवहन सेवेसाठी जेएनएनयुआरएम अंतर्गत बसेस खरेदीकरीता बँक ऑफ महाराष्ट्र या राष्ट्रीयीकृत बँकेकडून कर्ज घेण्याचे प्रस्तावित आहे.

## सुधारित २०१४-१५ चा अर्थसंकल्पात तूट येण्याची कारणे

- महापालिका उत्पन्नात येणारी **रु.३७७ कोटी** तूट, जेएनएनयुआरएम अंतर्गत प्रस्तावित अनुदान प्राप्त न झाल्याने **रु.२२५.९२ कोटी** तूट व जेएनएनयुआरएम अंतर्गत व इतर भांडवली कामांची प्रगती पाहता कर्ज घेण्याची आवश्यकता नसल्याने रक्कम **रु५४३.३३ कोटी** तूट याचा विचार करुन सुधारित अर्थसंकल्पातील जमा बाजूकडे महापालिका उत्पन्न **रु.१४३७ कोटी,** अनुदान **रु.१२६.७७ कोटी** कर्ज रक्कम **रु.४०.८६ कोटी** व आरंभीची शिल्लक **रु.४५.१२ कोटी** अपेक्षित धरुन एकूण **रु.१६४९.७५ कोटी** सुधारित जमा अंदाज प्रस्तावित करण्यात येत आहे.

## सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पातील महसुली व भांडवली खर्च

### I नागरी पायाभूत सुविधांचे बळकटीकरण

**१. रस्ते रुंदीकरण व नुतनीकरण :**

मागील दोन आर्थिक वर्षामध्ये ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अस्तित्वातील १३३ कि.मी. लांबीच्या मुख्य रस्त्यांची कामे डांबरीकरणाद्वारे हाती घेण्यात आली होती ती, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षापर्यंत करण्यात आली आहेत.

तसेच सन २०१३-१४ मध्ये ४१ चौकांचे मास्टीक अस्फाल्ट पध्दतीने डांबरीकरण करण्याची कामे हाती घेण्यात आली होती त्यापैकी २९ चौकांचे डांबरीकरण पूर्ण करण्यात आले असून, ९ चौकांच्या डांबरीकरणाची कामे प्रगतीपथावर असून, उर्वरीत ३ चौकांचे डांबरीकरण मार्च २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

या लेखाशीर्षकाअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये **रु.१५कोटी** तरतूद करण्यांत आली आहे.

**२. यु.टी.डब्ल्यू.टी पध्दतीने सिमेंट काँक्रीटीकरण :**

ठाणे महानगरपालिका हद्दीत एकूण ३५६ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे जाळे असून, त्यापैकी ७५ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण यु.टी.डब्ल्यु.टी. (Ultra Thin White Topping) पध्दतीने करण्यात आलेले असून सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात एकूण ४१ कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाची कामे हाती घेण्यात आली आहेत.

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये हाती घेण्यात आलेल्या एकूण ४१ कि.मी. लांबीच्या रस्त्यापैकी आतापर्यंत एकूण २९ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यांत आलेले आहे.

उर्वरीत १२ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम जानेवारी २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या लेखाशीर्षकातंर्गत सन २०१५-१६ मध्ये **रु.३२.५० कोटी** तरतूद करण्यांत आली आहे.

**३. मिसिंक लिंक :**

महापालिकेच्या विकास योजनेतील काही मुख्य रस्ते अद्याप एकमेकास जोडले गेलेले नाहीत. असे रस्ते निश्चित करण्यात आले असून हे जोड रस्ते विकसीत केल्यास मुख्य रस्त्यावरील वाहतुकीचा ताण कमी होऊ शकेल. या जोडरस्त्यामधील बांधकामे निष्कासीत करुन व पुर्नवसन करुन असे जोडरस्ते विकसीत करण्याचे काम प्राधान्याने हाती घेण्यात येणार आहे.

या लेखाशीर्षकाअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

**४. विकास आराखडयातील रस्ते विकास** : महापालिकेच्या विकास योजनेतील दळणवळणाच्या दृष्टीने अत्यावश्यक असलेल्या अविकसीत रस्त्यांनी बाधित भूखंडांचे भूमी संपादन विकास हक्क हस्तांतरणाच्या (टीडीआर) माध्यमातून करुन सदर रस्त्यांचे विकसन बांधीव विकास हक्क हस्तांतरणाच्या (कंन्स्ट्रक्शन टीडीआर) माध्यमातून करण्यावर पुढील आर्थिक वर्षात भर देण्यात येणार आहे.

**५. पार्कींग धोरण** : ठाणे महानगरपालिका क्षेत्रासाठी पार्कींग धोरण मंजूर असून त्यामध्ये रस्त्यावरील पार्कींग व रस्त्याव्यतिरिक्त पार्कींग (ऑफ स्ट्रीट पार्कींग) प्रस्तावित करण्यात आलेले आहे. पार्कींग पॉलीसी अंतर्गत राखीव भूखंडावर बीओटी किंवा पीपीपी बेसीसवर पार्कींग स्लॉट विकसीत करण्याचा मानस असल्याने सन २०१५-१६ या वर्षासाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

तसेच नाल्यांवरील पार्कींगसाठी **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**६. पादचारी पूल आणि सबवे** : पूर्व द्रुतगती महामार्ग व घोडबंदर रस्ता पादचा-यांना सुरक्षितपणे ओलांडता यावा म्हणून पूर्व द्रुतगती महामार्गावर आनंदनगर व ज्युपिटर हॅास्पिटल येथे पादचारी पूलाचे बांधकाम सुरु आहे. घोडबंदर रस्त्यावर तत्वज्ञान विद्यापीठ जंक्शन, आर मॅाल जवळ, ब्रम्हांड जंक्शन व कासारवडवली येथील साईनाथ क्रॅास रोड येथे ही पादचारी पूल बांधण्याचे काम प्रगतीपथावर असून, सदरची सर्व कामे सन २०१५-१६ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे. यासाठी सन २०१५-१६ च्या वर्षात **रु.१८ कोटी तरतूद** प्रस्तावित आहे.

पूर्व द्रुतगती महामार्गावरील तीन हात नाका, नितीन कंपनी

जंक्शन व कॅडबरी जंक्शनवरील वाहतुकीमध्ये मागील दहा वर्षामध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाल्यामुळे वाहनांची कोंडी होत असल्याने महापालिकेने वाहतुकीचे सर्वेक्षण करुन अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना तयार केल्या आहेत. आगामी आर्थिक वर्षामध्ये अल्पकालीन योजनेच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून तीन हात नाका व नितीन कंपनी जंक्शन दरम्यान दोन्ही सर्व्हीस रस्त्यांना जोडणारा सबवे बांधण्याचे प्रयोजन आहे. त्यासाठी सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पामध्ये **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित केली आहे.

एलबीएस मार्ग नं. १६ ते २२ पर्यंत फुट ओव्हर ब्रीज (एफओबी) बांधणेसाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात **रु.६ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**७. कळवा खाडीवर पूल** : या कामी तज्ञ सल्लागाराकडून आराखडे अंतिम करण्याचे काम सुरु असून, सदरचे काम आगामी तीन वर्षात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

सदर नियोजित पूल हा उत्तरेकडील साकेत बाजूस बांधून त्यास ठाण्याकडील बाजूस तीन रस्त्यांवरुन अप रॅम्प देण्यात येणार असून खाडी पार केल्यावर पूलाची एक मार्गीका कळवा शिवाजी चौकात व दुसरी मार्गीका छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयासमोर उतरणार आहे.

या कामासाठी राज्य शासन किंवा एमएमआरडीए यांचेकडून काही प्रमाणात निधी प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. सन २०१५-१६ या वर्षात या कामासाठी **रु.१४ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**८. रेल्वे लाईनवरील पूल :** कळवा पूर्व व पश्चिमेकडील नागरिक रेल्वे लाईन ओलांडून ये जा करीत असतात. त्या ठिकाणी वारंवार अपघात होत असल्याने नागरिकांकडून पादचारी पूल (एफओबी) बांधण्याची मागणी करण्यात येत आहे. हा पूल ४.८८ मी. रुंदीचा असून तो ठाणे व कळवा दरम्यान स्लो ट्रॅक रेल्वे लाईनवर बांधण्यात येणार आहे. हे काम रेल्वे मार्फत करण्यात येणार असून सन २०१४-१५ च्या सुधारित अर्थसंकल्पात या कामासाठी रु.३.३१ कोटी तरतूद करण्यात आली आहे. ही रक्कम रेल्वे प्रशासनाकडे वर्ग करण्यात येणार आहे.

**९. ठाणे पूर्व स्टेशन सुधारणा :** ठाणे (पूर्व) येथून ठाणे, मुंबई, मिराभाईंदर परिवहन व इतर खाजगी कंपन्यांच्या बसेस या भागातून ये-जा करतात. त्यामुळे सद्यस्थितीत वाहतुकीची कोंडी होत असल्याने महापालिकेमार्फत ठाणे (पश्चिम) प्रमाणे ठाणे पूर्व येथे सुध्दा सॅटीस सारखा प्रकल्प उभारण्याची आवश्यकता आहे.

प्रस्तुत प्रकल्पाच्या नियोजनासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात **रु.४० लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

रेल्वे प्रशासनाबरोबर संयुक्तपणे चर्चा करुन याबाबत नियोजन करण्यात येईल.

**१०. अस्तित्वातील जकात नाक्यांचा आंतरशहर वाहतूक स्थानक म्हणून विकास :**

महानगरपालिका हद्दीतील आनंदनगर, गायमुख, खारेगाव व शीळ येथे असलेल्या जकात नाक्यांच्या वापरा अभावी पडून असलेल्या जागेवर बस, ट्रक, टर्मिनसकरिता आंतरशहर वाहतूक स्थानक बी.ओ.टी तत्वावर विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे शहरातील रस्त्यावर ट्रक व बसेस उभ्या राहण्याचे प्रमाण कमी होवून वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही.

**११. एकात्मिक वाहतूक सुधारणा :**

सिव्हील हॉस्पिटल, कामगार हॉस्पिटल, कापूरबावडी नाका, बाळकूम नाका, नितीन कंपनी जंक्शन, वसंतविहार जंक्शन, कळवा शिवाजी चौक, पारसिक टी जंक्शन, क्रिक नाका या नऊ चौकांमध्ये पादचा-यांना सुरक्षितपणे रस्ता ओलांडण्यासाठी पदपथ सुधारणा व सिग्नल व्यवस्था करण्यासाठी आवश्यक स्थापत्य व विद्युत कामे तसेच रोटरी आयलँड यांची सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच आनंदनगर जकात नाका ते माजिवडा जंक्शन पर्यंत हायवे व सर्व्हिस रोड वर वाहतूक सुधारणा करण्याचे नियोजन आहे. यासाठी सन २०१५-१६ मध्ये **रु.३ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**१२. रोड ब्युटीफिकेशन, ट्रॅफिक आयलंड, साईनेजेस :**

सदर प्रकल्पांतर्गत लेन मार्किंग, झेब्रा क्रॉसिंग, आकर्षक सेंट्रल डिव्हायडर्स व झाडे लावणे, वाहतूक नियमानुसार फलक लावणे व रस्त्यावरील अस्तित्वातील झाडांची निगा, आयलँडस् ची कामे करणे, रस्त्याचा पृष्ठभाग व फुटपाथ स्वच्छ ठेवणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. यासाठी सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात **रु.३ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**१३. मीटरद्वारे पाणी पुरवठा** : प्रथम टप्प्यात व्यावसायिक व इतर इमारतींसाठी असलेल्या २५ मि.मी. व त्यावरील व्यासाच्या घरगुती नळ संयोजनांवर १५ ते ३०० मी.मी. व्यासाचे ई.ई.सी. मीटर पुरविणे, बसविणे, त्याची देखभाल दुरुस्ती करणे व त्यांचे वाचन घेऊन बिले तयार करुन वितरित करणे या कामाचा समावेश आहे. मीटर बसविण्याचे काम टप्प्या- टप्प्याने दोन वर्षात करण्यात येणार असून याकरिता **रु.१२.६१ कोटी** खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी सन २०१५-१६ वर्षात **रु.६.५० कोटी** खर्च अपेक्षित धरण्यात आलेला आहे.

**१४. जलकुंभांची शास्त्रोक्त पध्दतीने साफसफाई** : शहरातील एकुण ५२ जलकुंभांची शास्त्रोक्त पध्दतीने साफसफाई करण्याचे प्रस्तावित असून यासाठी **रु.१.५० कोटी** ची तरतूद प्रस्तावित आहे.

**II सामाजिक पायाभूत सुविधा**

**१. शाळा बांधणे** : कळवा, विटावा व मुंब्रा-कौसा येथील शाळेच्या इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर असून, मार्च - २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

विटावा येथील शाळेचे तळ अधिक चार मजल्याचे एकूण १४९४ चौ.मी. चे बांधकाम प्रगतीपथावर असून त्यामध्ये एकूण १४ वर्ग खोल्या, मुले व मुलींकरिता स्वतंत्र शौचालय व अन्य सुविधांचा समावेश आहे. सदरचे काम माहे मार्च २०१५ अखेरीस पूर्ण करण्याचे उद्दीष्ट असून पुढील शैक्षणिक वर्षात सदरची शाळा सुरु होईल.

मुंब्रा प्रभाग समिती अंतर्गत कौसा येथे आरक्षित असलेल्या ५१६० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावर शाळेची इमारत

बांधण्याचे काम सुरु असून यामध्ये तळ अधिक तीन मजल्यांचा समावेश आहे. शाळेच्या बांधकामात एकूण ४२ वर्गखोल्यांचा व अन्य सुविधांचा समावेश आहे.

शाळा बांधणे या लेखाशिर्षाअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये **रु.६.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

२. **हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे स्मारक बांधकाम** :

प्रभाग क्र. ३७ मध्ये सुविधा भुखंडावर हिंदुहृदय सम्राट शिवसेना प्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारण्याच्या कामाचे खालील दोन भागात नियोजन करण्यात आले आहे.

**पिरॅमिड आकाराची इमारत** :- ७२ फूट x ७२ फूट आकाराचे पिरॅमिड पध्दतीचे रुफ व काचेसारख्या मटेरियलचा वापर करुन उभारावयाचे आकर्षक बांधकाम असलेली इमारत असून त्यामध्ये आर्ट एक्झिबिशन्स, गॅलरी डिस्प्ले, कॉन्फरन्स स्पेसेस, मेडिटेशन, योगा स्पेसेस, लाईट आणि साऊंड शो योजना इत्यादी बाबींचा समावेश असेल.

**ॲनेक्स इमारत :-** पिरॅमिड आकाराच्या इमारती लगत तळ अधिक दोन मजल्याची ॲनेक्स इमारत बांधण्याचे प्रस्तावित असून सद्यस्थितीत इमारतीचे पाया बांधकाम पूर्ण झाले असून सदरचे काम २०१५-१६ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

या कामासाठी सन २०१५-१६ मध्ये **रु.५ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

३. **हँगिंग गार्डन** :

रायलादेवी प्रभाग समितीक्षेत्रात श्रीनगर येथे गार्डनसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर अंदाजे ४८०० चौ.मी इतक्या क्षेत्रफळामध्ये हँगिंग गार्डन तयार करण्याचे काम सुरु असून त्यामध्ये लहान मुलांसाठी व नागरीकांसाठी ड्राईव्हवे, सायकलींग

ट्रॅक, योगा व ध्यान केंद्र, इत्यादी सोयी सुविधा उपलब्ध होणार आहेत.

सदरचे काम मे २०१५ पर्यंत पूर्ण होणार असून त्यासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात **रु. ४९ लक्ष** तरतूद प्रस्तावित आहे.

४ **जुने ठाणे थीम पार्क** : माजिवाडा-मानपाडा समितीमधील घोडबंदर रोड येथील आरक्षित असलेल्या ३६०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या भुखंडावर बी.ओ.टी. तत्वावर "जुने ठाणे शहराची प्रतिकृती" या संकल्पनेनुसार थीम पार्क विकसित करण्याचे प्रस्तावित आहे.

५. **बॉलीवुड पार्क** : वर्तकनगर प्रभाग समितीमधील पद्मश्री अप्पासाहेब पवार उद्यानाचे "बॉलीवुड पार्क" या संकल्पनेनुसार बी.ओ.टी तत्त्वावर विकसित करण्याचे प्रस्तावित असून त्यामध्ये अस्तित्वातील उद्यानाचे अंदाजे ४००० चौ.मी. जागेवर प्रवेशद्वार, चित्रपट सृष्टीतील नामांकित कलावंतांच्या किमान सहा पूर्णाकृती फायबरची शिल्पे इत्यादी बाबींचा समावेश आहे.

६. **ट्रॅफिक पार्क** : महापालिका क्षेत्रातील कासार वडवली - कावेसर येथे ट्रॅफिक पार्क बी.ओ.टी. तत्वावर विकसित करण्याचे प्रस्तावित असून यामध्ये वाहतूक विषयक जागृती व विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांची माहिती मिळणेसाठी ट्रॅफिक पार्क निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे.

७. **नगरसेवक निधी** : सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात प्रति सदस्य **रु.२५ लक्ष** प्रमाणे एकूण **रु.३४.१२ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**८. छोटया स्वरुपाची मलप्रक्रिया केंद्रे :** महानगरपालिकेच्या हद्दीत जागेच्या उपलब्धतेनुसार अंदाजे चार ते पाच एम.एल.डी. छोटया स्वरुपाची मलप्रक्रिया केंद्रे बांधण्याचे नियोजन असून यासाठी अंदाजपत्रकात **रु.८ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**III शहर पर्यावरणामध्ये सुधारणा**

**१. एकात्मिक तलाव पुनरुज्जीवन :** राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत महापालिका क्षेत्रातील तुर्फेपाडा, नार, मासुंदा, जेल, हरीओमनगर, व कावेसर या सहा तलावांचे सविस्तर प्रकल्प अहवाल केंद्र सरकारकडे सादर करण्यात आलेले होते. पहिल्या टप्प्यात तुर्फेपाडा, कावेसर व मासुंदा या तीन तलावांसाठी ७० टक्के अनुदान **रु.६.५० कोटी** मंजूर करण्यात आले असून उर्वरीत ३० टक्के वाटा महापालिकेचा असणार आहे. सदर प्रकल्पासाठी सन २०१५-१६ वर्षासाठी **रु. ५ कोटी** तरतूद करण्यात आली आहे.

**२. प्लास्टिक पासून इंधन निर्मिती प्रकल्प :** महापालिका क्षेत्रातील पुनर्वापर न होणा-या प्लास्टिकमुळे नाले, गटारे तुंबून सखल भागात पाणी भरते अशा प्लास्टिकपासून प्रयोगिक तत्त्वावर २ टन क्षमतेचा प्रकल्प उभारुन प्लास्टिकपासून इंधन निर्मिती करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पासाठी **रु. २५ लक्ष** इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

**३. उदयान विभाग :** **अ) उद्यान विकास :-** अस्तित्वातील उद्याने विकसीत करणेसाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात विविध लेखाशीर्षाअंतर्गत **रु.१२.१३ कोटी** तरतूद करण्यात आली आहे.

**ब) थीम पार्क :-** थीम पार्क विकसीत करण्यासाठी सन २०१५-

१६ या आर्थिक वर्षात **रु.५ कोटी** तरतूद करण्यात आली आहे.

**क) सायन्स पार्क :-** सायन्स पार्क विकसीत करण्यासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात विविध लेखाशीर्षाअंतर्गत **रु.१ कोटी** तरतूद करण्यात आली आहे.

**४. वृक्षप्राधिकरण** : **अ) ५ लक्ष वृक्ष लागवड योजना :-** महानगरपालिकेमार्फत "५ लक्ष वृक्षलागवड योजना " राबविण्याचे प्रस्तावित असून महानगरपालिका, लोकसहभाग, प्रायोजक तसेच सेवाभावी संस्थांच्या सहभागातून पुढील २ वर्षात ५ लक्ष वृक्षलागवड करण्याची योजना राबविण्यात येणार आहे. सदर योजने अंतर्गत प्रथम टप्यात सन २०१५-१६ मध्ये मनपाकडून एक लक्ष वृक्ष तर सेवाभावी संस्था, पर्यावरण विषयक काम करणा-या व्यक्ती किंवा संस्था, विकासक, शाळा, महाविद्यालये यांचेकडून लोक सहभागातून १.५ लक्ष वृक्ष रोपे लागवडीचे उद्दीष्ट आहे. तर दुस-या टप्यात सन २०१६-१७ मध्ये २.५ लक्ष वृक्ष लावण्याचे नियोजन आहे. यामध्ये सप्तपर्णी, बहावा, कदंब, महोगनी, चाफा, कडुनिंब इत्यादी स्थानिक प्रजातींच्या वृक्षांचा समावेश करण्यात येणार आहे.

यासाठी सन २०१५-१६ मध्ये रक्कम **रु.४ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**५. घनकचरा व्यवस्थापन** : **अ) स्वच्छ भारत मिशन :-** स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छते बाबत प्रचार व प्रसार कार्यक्रमावर भर देऊन नागरिकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यात येईल. यासाठी सन २०१५-१६ मध्ये रक्कम **रु.७५ लक्ष** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**ब) सफाई मार्शल :-** शहरामध्ये अवेळी कचरा, डेब्रीज टाकून शहराचे विद्रुपीकरण करण्याच्या प्रवृत्तीस आळा घालण्याच्या दृष्टीकोनातून अशा व्यक्तींविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यासाठी सफाई मार्शलची नेमणूक करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी सन २०१५-१६ मध्ये रक्कम **रु.१ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. यासाठी स्वतंत्र प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करण्यात येईल.

**क) यांत्रिक पध्दतीने रस्ते साफसफाई :-** शहरातील मुख्य रस्त्यांची साफसफाई करणेसाठी प्रायोगिक तत्वावर यांत्रिक मशीन (Road Sweeping Machine) भाडेतत्वावर घेण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी सन २०१५-१६ मध्ये रक्कम **रु.४ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**ड) हस्तांतरण स्थानक विकसित करणे :-** शहरातून संकलित केलेल्या कच-याची वाहतूक शास्त्रोक्त पध्दतीने करणेसाठी सध्या उपलब्ध असलेल्या हस्तांतरण स्थानकाची क्षमता वाढविणेबरोबरच जागेच्या उपलब्धतेनुसार नवीन हस्तांतरण स्थानक विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठीचा स्वतंत्र प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करण्यात येईल. यासाठी सन २०१५-१६ मध्ये रक्कम **रु.१.७५ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**इ) वेस्ट टु एनर्जी प्रकल्प :-** सध्या शहरामध्ये जमा होणा-या घनकच-यावर प्रक्रिया करण्यासाठी वेस्ट टु एनर्जी प्रकल्प बीओटी तत्वावर विकसीत करण्याचा मानस आहे. या प्रकल्पामध्ये टिपिंग फी महापालिकेला दयावी लागणार आहे.

त्यासाठीचा स्वतंत्र प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करण्यात येईल.

६. **सांडपाण्याचा पुनर्वापर** : भुयारी गटार योजनेअंतर्गत सुमारे २५२ द.ल.लि. सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सहा मलप्रक्रिया केंद्र उभारण्यात येत आहेत. सदरच्या योजनेचे ६० टक्के काम पूर्ण झाले असून त्यापैकी दोन मलप्रक्रिया केंद्र कार्यान्वित करण्यात आले आहेत. दररोजच्या सांडपाण्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करुन निर्जंतुक केलेल्या पाण्याचा वापर बगीचा, कार वॉशिंग, अग्निशमन वाहनामध्ये करण्याचे विचाराधीन आहे. त्याकरिता कोपरी येथे टर्शरी ट्रिटमेंट प्लान्ट बांधण्यासाठी सन २०१५-१६ चे अर्थसंकल्पात **रु.५० लक्ष** तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

७. **विद्युत विषयक कामे व वीज बचत उपाय योजना** : **अ) वीज बचत योजना :-** महापालिकेच्या पथदीपांमध्ये ऊर्जा कार्यक्षमता व पर्यावरणाभिमुख तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या दृष्टीने व आर्थिक बचत होण्याच्या दृष्टीने पारंपारिक सोडियम व्हेपर दिव्यांच्या ऐवजी एल.ई.डी. तंत्रज्ञानाचा वापर सुरु करण्यात आल्यामुळे वीज बचत होणार आहे. त्याअंतर्गत चालू आर्थिक वर्षा अखेरपर्यंत ६१०० एल.ई.डी. पथदीप लावण्याचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. पुढील आर्थिक वर्षामध्ये वीज बिल बचतीच्या (Cost Saving Module) माध्यमातून महापालिकेस कोणताही भांडवली खर्च न करता १०००० एल.ई.डी. पथदिवे लावण्याचे नियोजन आहे. त्यासाठीचा प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करण्यात येईल.

**ब) सिग्नल यंत्रणा :-** महापालिकाक्षेत्रांर्गत वाहतुकीच्या

सुलभतेसाठी शहर वाहतूक विभागाबरोबर संयुक्त पाहणी करुन नवीन ट्रॉफिक सिग्नल बसविण्यात येणार आहे. त्यासाठी **रु. २ कोटी** तरतूद करण्यात आलेली आहे.

**क) सौर शहर :-** केंद्र शासनाने ठाणे शहराची सौर शहर म्हणून निवड केलेली आहे. त्या अंतर्गत विविध सेवांमध्ये अपारंपारिक ऊर्जा प्रकल्प राबविण्यासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**ड) रस्त्यावरील दिवाबत्ती :-** रस्त्यावरील दिवाबत्ती साठी या लेखाशीर्षाअंतर्गत **रु.५ कोटी** व मागासवर्गीय वस्ती मधील रस्त्यावरील दिवाबत्तीसाठी **रु.५ कोटी** असे एकूण **रु.१० कोटी** तरतूद सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात प्रस्तावित आहे.

**ई) पोल स्थलांतरीत करणे :-** सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात या लेखाशीर्षाअंतर्गत रु.२ कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

**फ) स्मार्ट सिटी सर्व्हेलन्स :-** ठाणे शहर स्मार्ट सिटी करण्याच्या दृष्टीने प्रथम टप्प्यामध्ये स्मार्ट सिटी सर्व्हेलन्स अंतर्गत महानगरपालिकेतर्फे रु.३ कोटीची तरतूद करण्यात येत आहे. या प्रकल्पाअंतर्गत पोलीस विभागाच्या समन्वयातून सीसीटीव्ही व त्यासाठी नियंत्रण कक्ष यांचा अंतिम आराखडा तयार करण्यात येत आहे. शहरातील नागरिकांची सार्वजनिक ठिकाणी सुरक्षितता राखण्यासाठी सीएसआर अंतर्गत निधी प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

**IV सामाजिक पायाभूत सुविधांची आणि सुखसोयींची दर्जोन्नती :**

| | | |
|---|---|---|
| १. | **शिक्षण व्यवस्थेमध्ये सुधारणा** : | **अ) दप्तर विरहीत शाळा :-** शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून इ.पहिली व दुसरी च्या विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करुन त्यांना स्वयंअध्ययनाच्या माध्यमातून त्यांच्या मुलभूत क्षमता व कौशल्याचा विकास करुन त्यांना स्वयंअध्ययनाची सवय लावण्याच्या दृष्टीकोनातून दप्तर विरहीत शैक्षणिक प्रणाली राबविण्यात येणार आहे.<br>**ब) ई लर्निंग :-** ई लर्निंग व्हॅच्यूअल क्लास पध्दतीने शालेय अभ्यासक्रमाचे दृकश्राव्य (Audio Visual) पध्दतीने अध्यापन करण्यासाठी विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रम व इतर माहिती सी.डी. द्वारे समजावून सांगितल्यास विद्यार्थ्यांच्या आकलन शक्तीत भर पडण्यास मदत होईल. यासाठी आठ गटांमध्ये आठ केंद्र सुरु करण्यात येणार आहे.<br>**क) विद्यार्थ्यांसाठी विविध योजना :-** सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात या लेखाशीर्षाअंतर्गत **रु.२० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे |
| २. | **कौसा रुग्णालय** : | ठाणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयानुसार मुंब्रा प्रभाग समिती मधील कौसा येथे ४.१२ हेक्टरचा भूखंड रुग्णालयासाठी आरक्षित असून या भूखंडावर १०० खाटांचे रुग्णालय बांधण्याचे काम सुरु करण्यात आलेले असून मार्च २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.<br>यासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात **रु.१३ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे. |

**३. छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय** : छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या तळ मजल्यावरील बाहय रुग्ण विभाग, पहिल्या मजल्यावरील शस्त्रक्रिया गृह, अतिदक्षता कक्ष, रुग्णालयांचे वॉर्डस, इत्यादींचे नुतनीकरण करण्याचे नियोजन आहे. तसेच राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालयाच्या गच्चीचे वॉटर प्रुफींग, इमारतीचे नुतनीकरण, इत्यादी कामे करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात रुग्णालय दुरुस्ती या लेखाशीर्षकांतर्गत **रु.८ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

रुग्णांच्या सेवेसाठी छत्रपती शिवाजी महाराज रग्णालय येथे ICU जवळ एक नवीन लिफ्ट तसेच शव ठेवण्यासाठी अद्यावत Cold Storage Room तयार करण्यासाठी व विविध विद्युत कामांसाठी **रु.५ कोटी** तरतूद करण्यात आलेली आहे.

तसेच विविध उपकरणे खरेदीसाठी **रु.१० कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

या तीन प्रमुख लेखाशीर्षाअंतर्गत एकूण **रु.२३ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**४. आरोग्य आणि वैद्यकीय सुविधा** : **अ) डायलेसीस सुविधा पुरविणे :-**

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात ५ ठिकाणी डायलेसीस सुविधा नागरिकांना उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे. शहरातील ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.१ लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा नागरिकांना मोफत रु.४.५० लक्ष रुपया पेक्षा कमी उत्पन्न गटातील रुग्णांना ५० टक्के सूट दिली जाईल व ५० टक्के रक्कम ठाणे महापालिका डायलेसीस केंद्र चालिवणा-या संस्थेस अदा केले जातील व वार्षिक उत्पन्न

रु.४.५० लाख रुपयापेक्षा जास्त असलेल्या रुग्णांना रु.१००० ते रु.१२०० प्रति डायलेसीस याप्रमाणे ही सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

डायलेसीस सेवा पुरविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात रक्कम **रु.६० लक्ष** व इतर रुग्णालयांमध्ये **रु. २ कोटी** तरतूद करण्यात आली आहे.

**ब) रुग्णालये व दवाखाने :-**

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात महापालिकेच्या रुग्णालये व दवाखान्यांसाठी उपकरणे व इतर साहित्य खरेदी करणेसाठी **रु.१३.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**क) सी आर वाडीया हॉस्पीटल:-**

सी आर वाडीया हॉस्पीटल नुतनीकरणासाठी **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**ड) राष्ट्रीय शहरी आरोग्य मिशन :-** महापालिका क्षेत्रातील दिल्या जाणा-या आरोग्य सेवांचा दर्जा उंचाविण्यासाठी भारत सरकारकडून मिळणा-या केंद्रीय निधीमधून राष्ट्रीय शहरी आरोग्य मिशन राबविण्यात येईल.

**५. स्मशानभूमी / कब्रस्तान एकात्मिक विकास व विस्तार कार्यक्रम :** ठाणे महापालिकेच्या अधिपत्त्याखाली असलेल्या एकूण ३७ स्मशानभूमींचा एकात्मिक स्मशानभूमी विकास कार्यक्रम ठाणे महापालिकेने हाती घेतला असून तो टप्प्याटप्प्याने करावयाचा असून यासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात **रु.६ कोटी** तरतूद प्रस्तावित केली आहे.

**६. अत्याधुनिक कत्तलखाना उभारणी करणे :** कौसा येथील आरक्षित भूखंडावर अत्याधुनिक कत्तलखाना उभारणी करण्याचे प्रस्तावित आहे. प्राप्त प्रकल्प

अहवालाचा अभ्यास करण्यासाठी तज्ञ गटाची नियुक्ती व इतर अनुषंगिक परवानगी यासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात **रु.२५ लक्ष** पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे.

**V आपत्कालीन व्यवस्थापन**

**१. प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन कक्ष :**

नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीमध्ये जलद व प्रभावी प्रतिसादाद्वारे जीवन आणि मालमत्ता यांची कमीत कमी हानी व्हावी या दृष्टिकोनातून जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना केली आहे.

आपत्ती मध्ये महानगरपालिका यंत्रणेत अधिक सक्षमपणे सामोरे जाता यावे यासाठी या कक्षाचे बळकटीकरण करण्यात येणार आहे. त्यामुळे कमीत कमी जीवित व वित्त हानी टाळण्यास मदत होईल.

आपत्ती व्यवस्थापन कक्षासाठी सन २०१५-१६ च्या आर्थिक वर्षात **रु. ४.५०कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**२. अग्निशमन सेवा सुधारणा :**

मुंब्रा व वागळे या दोन अग्निशमन केंद्रांची पुनर्बांधणी करण्यात येणार असून त्यासाठी रक्कम **रु.३ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे. तसेच अग्निशमन विभागासाठी दुचाकी वाहने, मोठी वाहने व साधनसामुग्री खरेदी करणेसाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात **रु.९ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

## VI समाज कल्याण

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **महिला व बाल कल्याण कार्यक्रम** | : | महिला बालकल्याण समितीमार्फत सन २०१४-१५ ते २०१८-१९ या पाच आर्थिक वर्षांसाठी महिला व बालकल्याण कार्यक्रमांतर्गत पंचवार्षिक योजना तयार करण्यात आली असून त्या योजनेनुसार कार्यवाही करणेसाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी **रु.२० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे. |
| २. | **नि:समर्थ कल्याणकारी योजना** | : | महानगरपालिका क्षेत्रातील नि:समर्थ, मतिमंद, कुष्ठरुग्ण, अंध इत्यादी नागरिकांचे जीवनमान उंचावणे, त्यांना आरोग्य विषयक सोयी सवलती उपलब्ध करुन देणे, त्यांचा शैक्षणिक स्तर उंचावणे या उद्देशातून ही योजना राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार दारिद्रय निर्मुलन कार्यक्रमाअंतर्गत ३ टक्के रक्कमेची नि:समर्थ व्यक्तींच्या कल्याणकारी योजनांसाठी तरतूद करणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात अपंगांसाठी कल्याणकारी योजनांतर्गत **रु.९.२२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे. |
| ३. | **मागासवर्गीय कल्याण** | : | महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी अंदाजपत्रकात महापालिकेच्या स्वतःच्या उत्पन्नातून बांधील खर्च वजा जाता शिल्लक उत्पन्नाच्या ५ टक्के निधी राखीव ठेवणे आवश्यक असल्याने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात दायित्वासह विविध विभागांतर्गत एकूण **रु.७३ .६० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | **क्रीडा विषयक सोयी सुविधा** | : | **अ) कौसा प्रादेशिक क्रीडा संकुल :-** कौसा येथील प्रादेशिक क्रीडा संकुलाचे काम अंतिम टप्प्यात असून सन २०१५-१६ मध्ये ते पूर्ण करुन खेळाडूंसाठी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात **रु.१२.३४ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.<br>**ब) दादोजी कोंडदेव क्रीडाप्रेक्षागृह :-** महाराष्ट्र शासनाची आर्थिक मदत घेवून सिन्थॅटिक ट्रॅक तयार करण्याचे निश्चित केले असून ठाणे महानगरपालिकेने एकूण खर्चाच्या ३५ टक्के रक्कम स्वःनिधीतून करणे आवश्यक आहे. तसेच ठाणे महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात विविध प्रभागात मोकळया जागी ओपन जीम, सायकल ट्रॅक, जॉगींग ट्रॅक तयार करण्याचे प्रस्तावित असून ना नफा ना तोटा या तत्वावर सभासदत्व देण्याचे निश्चित केले आहे. त्याअनुषंगाने सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात रक्कम **रु.२ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.<br>**क) अस्तित्वातील शाळांना क्रीडांगणे उपलब्ध करून देणे :** ठाणे महानगरपालिकेच्या ताब्यात असलेले व भविष्यात हस्तांतरीत होणारे क्रीडांगणाचे भूखंड नजिकच्या अस्तित्वातील शाळांना वापरण्यास व सुस्थितीत राखण्याचे धोरण निश्चित करण्यात आले असून शाळांच्या मागणी प्रमाणे व क्रीडांगणाचे उपलब्धते नुसार येत्या आर्थिक वर्षात वितरित करण्याचे प्रस्तावित आहे. |
| ५. | **शहर फेरीवाला धोरण** | : | फेरीवाला धोरणानुसार फेरीवाल्यांची नोंदणी प्रक्रिया सुरु असून ७५९६ फेरीवाल्यांनी आवश्यक कागदपत्रासह नोंदणी फॉर्म ठाणे महानगरपालिकेकडे दाखल केलेले आहेत. |

केंद्र शासनाच्या पदपथावरील विक्रेता(उपजिविका संरक्षण व पदपथावरील विक्रीचे विनियमन) अधिनियमानुसार फेरीवाला योजना व नियम करण्याचे काम शासनामार्फत करण्यात येत आहे. या धोरणानुसार ९ मी. पेक्षा कमी रुंदीच्या रस्त्यावर व्यवसाय करण्यास प्रतिबंध घालण्यात आलेला आहे.

फेरीवाल्यांसाठी शहरामध्ये नवीन जागा उपलब्ध करुन देणे, फेरीवाल्यांनी सुनियोजितपणे पदपथावर व्यवसाय करण्यासाठी मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या मोजमापाच्या जागांचे रेखांकन करणे, सीसीटीव्ही लावणे, सुरक्षा रक्षक नेमणे इत्यादी साठी खर्च आवश्यक असल्याने याकरीता अर्थसंकल्पात **रु.२.५० कोटी** इतक्या रकमेची तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**६. धोकादायक इमारतींचे सर्व्हेक्षण व निष्कासन :**

मोडकळीस व धोकादायक इमारतीच्या निष्कासन कार्यपध्दतीमध्ये बदल करण्यासाठी अभ्यासगटाची नेमणूक करुन त्यानंतर आवश्यकता तपासून तसा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. महासभेपुढे ठेवण्यात येईल. तसेच धोकादायक इमारती निष्कासीत करण्यासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात **रु.१.५० कोटी** तरतूद प्रस्तावित असून अनधिकृत बांधकामांचे नियंत्रण व निष्कासनासाठी **रु.२.५० कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## VII जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान (जेएनएनयुआरएम)

१. **भुयारी गटार योजना टप्पा १,२ व ३** : ठाणे महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आलेल्या जे.एन.एन.यु.आर.एम. अभियानाअंतर्गतच्या भुयारी गटार योजना टप्पा क्र. १ अंतर्गत - ९७.६२ टक्के, टप्पा क्र. २ अंतर्गत - ४२.६९ टक्के व टप्पा क्र. ३ अंतर्गत - ९०टक्के एवढी भौतिक प्रगती झालेली असून पुढील वर्षी ही सर्व कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

२. **आर्थिक दुर्बल घटकांसाठी मुलभूत सोयी (बीएसयुपी)** : बीएसयुपी टप्पा क्र. १, ३ व ४ ची कामे प्रगती पथावर असून सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात केंद्र शासन, राज्य शासन व महापालिका हिस्सा मिळून एकूण **रु.९६.७६ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

३. **परिवहन बस खरेदी** : जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान अभियाना अंतर्गत परिवहन सेवेकरिता एकूण २३० बसेस खरेदी करण्यात येणार आहेत. याकरीता केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे ५० टक्के व ३० टक्के या प्रमाणे निधी प्राप्त होणार आहे. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात केंद्र शासन, राज्य शासन व महापालिका हिस्सा मिळून एकूण **रु.५२.३७ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

## VIII परिवहन सेवेस अनुदान

ठाणे परिवहन उपक्रमाच्या बसेसच्या संचलनासाठी महापालिकेकडून ओवळा व मुल्लाबाग येथे बस टर्मिनस उभारण्याचे काम प्रगती पथावर आहे. याकरिता अर्थसंकल्पात **रु.४ कोटी ४० लक्ष** इतक्या रकमेची तरतूद प्रस्तावित

करण्यात आलेली आहे.

परिवहन सेवेसाठी अनुदान म्हणून **रु. ४० कोटी** व परिवहन संचलन तूट भरुन काढण्यासाठी **रु. १ कोटी** तरतूद प्रस्तावित करण्यांत आली आहे.

**IX प्रशासकीय कामकाजात सुधारणा**

**१. संगणकीकरण** : सन २०१४-१५ मध्ये संगणकीकरणासाठी **रु.१४ कोटी** प्रस्तावित होते. परंतु निविदा प्रक्रीया अंतिम न झाल्याने ती तरतूद कमी करुन **रु.३ कोटी ८२ लक्ष** सुधारित करण्यात आली आहे.

महानगरपालिकेचे डेटा सेंटर योग्य प्रकारे कार्यान्वित करुन तेथे मालमत्ता कर व्यवस्थापन व ऑनलाईन कर भरणा करणेसाठीची संगणक प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली असून सर्व प्रभाग कार्यालये व मुख्यालय यांच्यातील नेटवर्कींगची कामे पूर्ण झाली आहेत.

अशा प्रकारे संगणकीकरणासाठी सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात **रु.१८ कोटी** तरतूद प्रस्तावित आहे.

**२. प्रशासकीय सुधारणा** : १) अधिकारी कर्मचा-यांची प्रशिक्षणातून क्षमता बांधणी .

२) नागरिकांना दिल्या जाणा-या सेवांचा दर्जा उंचाविण्यासाठी महानगरपालिका व अधिनस्त कार्यालयांचे आयएसओ 9001:2008 प्रमाणकीकरण.

३) कार्यालयीन कामकाज पध्दतीची फेर आखणी व सुधारणा

४) महापालिकेच्या अभिलेख कक्षातील दप्तराचे वर्गीकरण, निंदणी व जतन करणेसाठी स्कॅनींग व डिजीटलायझेशन

५) कार्यालयातील नस्त्यांचे संनियंत्रण करणेसाठी डॉक्युमेंट

जर्नी मॉनिटरींग सिस्टिम. (डीजीएमएस)

६) अधिकारी व कर्मचा-यामंध्ये उत्तम काम करण्याची निकोप स्पर्धा होऊन उत्तम कार्यसंस्कृतीची जपणूक होण्यासाठी अधिकारी व कर्मचा-यांना गुणवत्ता पुरस्कार

**आभार :**

भारताचे मा. पंतप्रधान यांच्या नेतृत्वाखालील स्वच्छ भारत मिशन, जेएनएनयुआरएम, सार्वजनिक रिन्युवेबल एनर्जी, सोलार सिटी, बी.एस.यु.पी, राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना आणि अन्य कार्यक्रमांच्या माध्यमातून ठाणे शहराच्या विकासाला चालना देण्यासाठी केंद्र शासनाने जे योगदान दिले आहे या बद्दल कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.

त्याचप्रमाणे महाराष्ट्राचे मा.मुख्यमंत्री, मा.पालकमंत्री, मा.उपसभापती, विधान परिषद, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मा.खासदार, मा.आमदार, मा.मुख्य सचिव , महानगर आयुक्त आणि विशेषत: नगर विकास विभागाचे मा.सचिव व पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे मा.प्रधान सचिव तसेच शासनातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांनी महापालिकेस केलेल्या सहकार्याबद्दल विशेष आभारी आहे.

ठाणे शहराच्या सर्वांगीण विकास प्रक्रियेत पुरोगामी धोरणात्मक निर्णय घेऊन त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मला आणि माझ्या सहकारी अधिका-यांना प्रोत्साहीत करीत असलेले मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती, स्थायी समिती, मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते,

सर्व पक्षीय मा.गटनेते , सर्व नगरसेवक व सर्व पक्षांचे मा.लोकप्रतिनिधी यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

ठाणे महानगरपालिकेच्या या सर्व कार्यक्रम अंमलबजावणीसाठी सक्रीय सहभागी असलेले महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री. सुनील चव्हाण, श्री. अशोककुमार रणखांब व विविध विभागातील विभाग प्रमुख व अधिकारी आणि कर्मचारी तसेच कर्मचारी संघटना यांचे मी आभार मानतो.

सन २०१५ मध्ये First Smart Cities Council, New Delhi चा " India's Most Promising Cities" पैकी एक हा बहुमान ठाणे शहरास नुकताच प्राप्त झालेला आहे, हे मी नम्रपणे सांगू इच्छितो.

या पार्श्वभूमीवर सादर केलेल्या या अर्थसंकल्पीय अंदाजाद्वारे प्रस्तावित केलेल्या कामांना, प्रकल्पांना आणि धोरणांना मूर्त स्वरुप प्राप्त झाल्यावर ठाणे महानगरपालिकेचा सर्वांगीण विकास करण्याची प्रक्रिया अधिक गतिमान होईल असा मला विश्वास आहे. त्या दृष्टीने आपला सहभाग व सहकार्य लाभेल अशी आशा बाळगून या आर्थिक वर्षाचे महसुली व भांडवली उत्पन्न व खर्चाचे शिल्लकी अर्थसंकल्पीय अंदाज मा.महासभेस शिफारस करणेसाठी आपल्याकडे सादर करीत आहे. त्यास आपण मान्यता द्यावी ही विनंती.

**धन्यवाद ! जय हिंद !!**

**संजीव जयस्वाल**

**महापालिका आयुक्त**